लोकमत पृ. ५१.९.


# वसई-विरार शहर परिसरात शुक्रवारी-शनिवारी पाणीबाणी

## ३० तास पाणीपुरवठा राहणार बंद : 'सूर्या'ची जलवाहिनी जोडणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा/वसई :** वसई-विरार शहर महानगरपालिका परिसराची लोकसंख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. शहराची वाढती तहान भागवण्यासाठी वसई-विरारला सूर्या प्रकल्पाचे अतिरिक्त पाणी देण्यासाठी जलवाहिनी जोडणी करण्यासाठी शुक्रवारी आणि शनिवारी तब्बल ३० तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे. यामुळे शहरात पाणीबाणी राहण्याची शक्यता असून, नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या वसई-विरार शहरांची लोकसंख्या गेल्या काही वर्षांत ३० लाखांच्या वर गेली असल्यामुळे शहराला सध्या होणारा पाणीपुरवठा कमीच पडत आहे. सूर्या टप्पा-१ व ३ या योजनेतून २०० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी उपलब्ध होत आहे. मात्र महानगरपालिकेस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सूर्या प्रकल्पातून ४०३ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा योजनेतून १७० दशलक्ष लिटर पाण्यापैकी ८० ते ९० दशलक्ष लिटर पाणी उपलब्ध होत आहे.



वसई-विरारला सूर्या प्रकल्पाचे अतिरिक्त पाणी देण्यासाठी जलवाहिनी जोडणीसाठी पाइप आणले गेले आहेत.

### दोन दिवस अपुऱ्या दाबाने पाणी

अतिरिक्त पाणी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने काशिदकोपर एमबीआर येथे सूर्या योजनेतील मुख्य जलवाहिनीस शुक्रवारी जोडणीचे काम करावयाचे आहे. या कामाकरिता सूर्या टप्पा- १ व टप्पा-३ सह मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सूर्या योजनेतून होणारा संपूर्ण पाणीपुरवठा १९ एप्रिलला सकाळी ९ ते २० एप्रिलला दुपारी ३ वाजेपर्यंत असा ३० तास बंद ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर पाणीपुरवठा सुरु झाल्यानंतर पुढील दोन दिवस अपुऱ्या दाबाने शहरास पाणीपुरवठा होणार आहे. नागरिकांनी उपलब्ध पाणी जपून वापरावे व महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

### मीरा-भाईंदरमध्येही शुक्रवारी पाणी नाही

मीरा-भाईंदर शहराला होणारा एमआयडीसीचा पाणीपुरवठा शुक्रवारी २४ तासांसाठी दुरुस्तीच्या कामामुळे बंद राहणार आहे. या शहरांना स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणीपुरवठा करण्यात येतो.

**एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा योजनेच्या अंतर्गत बारवी गुरुत्व वाहिनीचे कटाई नाका ते शीळ टाकी येथे तातडीची देखभाल व दुरुस्तीची कामे करण्याकरिता २४ तासांचा शटडाउन घेतला जाणार आहे.**

यामुळे गुरुवारी (दि. १८) रात्री १२ वा. ते शुक्रवारी (दि.१९) रात्री १२ वाजेपर्यंत असा २४ तासांसाठी एमआयडीसी प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे. या दरम्यान स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा सुरु राहणार आहे.




## विद्यार्थिनीची आत्महत्या; गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** फादरवाडीच्या सनशाईन परिसरात राहणाऱ्या विद्यार्थिनीने केलेल्या आत्महत्या प्रकरणात पोलिसांनी काकीसह शिक्षिकेविरोधात गुन्हा दाखल केला आहे. फादरवाडीच्या सनशाईन ग्रीन पार्क येथे राहणाऱ्या धनश्री गायकवाड (१६) या अल्पवयीन मुलीने १८ डिसेंबर रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. याप्रकरणी वालीव पोलिस अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास करत होते.

पोलिसांनी केलेल्या तपासात तिची चुलती आणि वर्ग शिक्षिका यांच्या त्रासाला कंटाळून नैराश्यात जाऊन तिने घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. वालीव पोलिसांनी सोमवारी मुलीच्या आईच्या तक्रारीवरून हेमलता गायकवाड आणि गीता वर्गीस यांच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

लोकमत पु.पा.३.


# नायगावमध्ये शासकीय जागेत बेकायदा वाहनतळ

## प्रशासनाचे दुर्लक्ष : आर्थिक संबंधांचा स्थानिकांकडून आरोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** नायगाव परिसरातील पूर्व व पश्चिम परिसरात मोठ्या प्रमाणात बेकायदा वाहनतळांचा पसारा वाढला आहे. सरकारी भूखंडांवर बेकायदा पार्किंगची समस्या निर्माण झाली असताना पोलिस, तहसीलदार, मिठागर विभाग व पालिका अधिकारी कोणतीच कारवाई करत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

नायगाव परिसरात सरकारी भूखंडांचा खासगी कामांसाठी सर्रास वापर सुरू आहे. या भूखंडांवर जे बेकायदा वाहनतळ उभे राहिले आहेत, त्यातून संबंधित प्रशासकीय अधिकारी मोठ्या प्रमाणात वसुली करत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.



### अनेक ठिकाणी होतेय बेकायदेशीर पार्किंग

नायगाव पूर्वेत सध्या मोठ्या प्रमाणात अनधिकृत वाहनतळांचा पसारा वाढत असून, सरकारी जागा अडवून तेथे बेकायदेशीर पार्किंग केले जात आहे. या बेकायदा पार्किंगमधून राजरोस हप्ते वसुली केली जाते. त्यावर नियंत्रण ठेवण्याऐवजी सर्रास त्याला खतपाणी घातले जात आहे. जे अनधिकृत पार्किंगचा व्यवसाय करत आहेत, त्यांच्याकडून ठराविक हप्ता स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या घशात जात असल्याचा आरोप होत आहे.

### पार्किंग धोरणाचे वसईत तीनतेरा

- या भूखंडांवर बेकायदा बॅनरबाजीलाही उधाण आले आहे. या बॅनरबाजीतूनही लाखोंची वसुली होत आहे. आधीच वसईत पार्किंग धोरणाचे तीनतेरा वाजले आहेत. त्यात नायगाव पूर्व, पश्चिम परिसरात सरकारी भूखंडांचा बेकायदा वाहनतळासाठी होत असलेला वापर चिंताजनक आहे.
- नायगाव पूर्व परिसरात वाहनचोरीचे प्रमाण वाढत आहे. यामुळे वाहनचालकांना आपली वाहने बेकायदा पार्किंगच्या ठिकाणी लावावी लागतात. यात नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

लोकमत पु.पा.१.


उत्तनमध्ये रोज सव्वाशे ते दीडशे टन कचरा

# ओल्या-सुक्या कचऱ्याचा डोंगर; वर्गीकरण न करणारे मोकाटच!

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** घनकचरा अधिनियमानुसार ओला व सुका कचरा वेगळा करून देणे बंधनकारक आहे. त्याच पद्धतीने वर्गीकरण केलेल्या कचऱ्याची वाहतूक करून शास्त्रोक्त प्रक्रिया करून विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे; परंतु मीरा-भाईंदर महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे रोज सुमारे दीडशे टन कचरा ओला व सुका असा एकत्रच उत्तन येथे बेकायदेशीर डम्पिंग करणे सुरूच आहे. त्यामुळे आधीच्या कचऱ्याचा डोंगर वादग्रस्त ठरला असताना रोज नव्याने कचऱ्याचा डोंगर उभा केला जात आहे.

कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यासाठी राज्य शासनाने मीरा-भाईंदर पालिकेला उत्तनच्या धावगी येथे ३१.४६ हेक्टर इतकी कोट्यवधी किमतीची जागा फुकट दिली; परंतु पालिकेने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प केवळ नावाला चालवला आहे.



- शहरात रोजचा सुमारे ५०० ते ५५० टन कचरा निघतो. त्यात ओला व सुका कचऱ्यासह बर्फिंगचा कचरा, नाले-गटारमधील गाळ, झाडांच्या फांद्या-पालापाचोळा आदींचा समावेश असतो. घनकचरा अधिनियमानुसार तसेच न्यायालय, हरित लवाद आदींच्या वेळोवेळीच्या आदेशानुसार ओला व सुका कचरा वेगळा करून त्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करणे बंधनकारक आहे.
- परंतु आजही शहरातील झोपडपट्ट्या, चाळी, गावठाण, अनेक निवासी संकुलापासून असंख्य दुकाने, खाद्यपदार्थांच्या हातगाड्या, हॉटेल आदी विविध भागांतून सर्रास ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण न करताच एकत्र दिला जातो. वर्गीकरण नसलेला कचरा पालिका ठेकेदारामार्फत गाड्यांमध्ये भरून उत्तन डम्पिंग येथे बेकायदेशीरपणे आणून टाकत आहे.
- कचरा वर्गीकरण करून आल्यास त्यावर प्रक्रिया होऊन दुर्गंधी पसरणार नाही, आग लागणार नाही व कचऱ्याचा डोंगर वाढीस लागणार नाही, असे स्पष्ट असूनदेखील पालिका अधिकारी व कर्मचारी आणि ठेकेदार यांना कायदे नियम आणि नागरिकांच्या हितापेक्षा स्वतःच्या आर्थिक फायद्याचेच सोयरसुतक असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

# नालासोपाऱ्यात सापडले नवजात अर्भक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** तुळींज ब्रीजजवळील अमित डेअरीसमोरील शांतीकुटीर इमारतीच्या गेटसमोर नुकतेच जन्मलेले नवजात अर्भक रविवारी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास आढळल्याची घटना घडली आहे. या इमारतीमधील भांड्याचे दुकानदार इंदरसिंग भाटी (३१) यांना हे अर्भक आढळून आले. त्यांनी तुळींज पोलिसांना याबाबत माहिती दिली. तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी पालकांचा शोध सुरू केला आहे.

इंदरसिंग यांना ते भांड्याच्या दुकानात असताना इमारतीच्या गेटसमोर एक नवजात अर्भक दिसून आले. त्यानंतर त्यांनी तत्परता दाखवत तुळींज पोलिस ठाण्यात संपर्क साधून याची माहिती दिली. पोलिसांच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यांनी पोलिसांच्या मदतीने अर्भक तपासणीसाठी पालिकेच्या रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी त्याला दाखल करण्यापूर्वी तपासले असता ते मृत घोषित केले.

CamScanner

लोकमत पृ.५/४.



वाहने उचलून नेताना वाहतूक विभागाचे अधिकारी, कर्मचारी.

# रस्त्यातील सोडून सोसायटी आवारातील वाहने उचलली

## वाहतूक पोलिसांच्या कारवाईविरोधात संताप

लोकमत न्यूज नेटवर्क

**वसई :** मुख्य रस्त्यांतील रहदारीस अडथळा ठरणारी वाहने हटविण्याऐवजी सोसायटी आवारात घुसखोरी करून वाहने उचलून नेत असल्याने वाहतूक पोलिसांविरोधात सामान्य नागरिकांनी संताप व्यक्त होत आहे. खासगी सोसायटी, आस्थापना, बँका, रुग्णालये आदी ठिकाणी विविध कामांनिमित्ताने जाणाऱ्या नागरिकांची वाहने नियमबाह्य पद्धतीने टोइंग केली जात असल्याने आपली वाहने ठेवायची तरी कुठे? असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडलेला आहे.

वसई-विरार शहरातील मुख्य रस्त्यांवर अनधिकृतपणे उभी करण्यात येत असलेली दुचाकी, चारचाकी व फेरीवाले यांमुळे रहदारीत अडथळा निर्माण होत असतो. परिणामी सामान्य नागरिकांना प्रचंड त्रास होतो. अनेकदा शाळा मार्गांवर सकाळ-संध्याकाळच्या वेळात अवजड वाहने उभी असतात. तसेच शहरात होणारी बेकायदा रिक्षा वाहतूक, सुसाट धावणारे अनधिकृत टँकर, त्यातून सांडणाऱ्या पाण्यामुळे कित्येकदा छोट्या-मोठ्या अपघातांना सामोरे जावे लागत असते. याबाबत सामान्य नागरिकांच्या तक्रारी असतात.

दुसरीकडे बहुतांश सोसायटी, दुकानदार, बँका, आस्थापना यांनी वाहतूक पोलिसांकडे तक्रार अर्ज केलेत. याच्या आधारे वाहतूक पोलिस सामान्यांची वाहने टोइंग करताहेत.

### सोसायटीतून वाहने उचलली जात असतील तर ते चुकीचे

कित्येकदा सोसायटी, बँका किंवा आस्थापनांसमोरील रस्त्यावर अनधिकृतपणे वाहने उभी केली जात असल्याने रहदारीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे आमच्याकडे तक्रारी येत असतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण करत असलेली वाहने आम्ही उचलत असतो, परंतु सोसायटीच्या आवारातून वाहने उचलून नेली जात असतील तर ते चुकीचे आहे.

- प्रशांत लांगी, वाहतूक पोलिस निरीक्षक, विरार

पत्नीसह मी मंगळवारी सकाळी फुलपाडा-स्टेशन रोडवरील शामराव विठ्ठल को-ऑप. बँकेत कामानिमित्त गेलो होतो. माझी दुचाकी बँकेचे कार्यालय असलेल्या सोसायटी आवारात पार्क केली होती. वाहतूक पोलिसांनी सोसायटी समोरील मुख्य रस्त्यावर वाहतुकीस अडथळा ठरणारी वाहने टोइंग करण्याऐवजी सोसायटी आवारात पार्क माझी दुचाकी उचलून नेली.

- संजय राणे, रहिवासी, विरार

- सोसायटी आवारातील वाहने टोइंग करणे हे नियमबाह्य आहे, असे नागरिकांचे मत आहे.

पुण्यनगरी पृ.१.

# नालासोपारा येथे दोन बांगलादेशींना अटक

**नालासोपारा :** नालासोपारा प्रगती नगर शिव सम्राट बिल्डींग येथे बांगलादेशी असणाऱ्या महिला व पुरुषांवर कारवाई करुन अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश आले आहे.



तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिव सम्राट बिल्डींग,प्रगती नगर नालासोपारा काही परकीय नागरिक अनधिकृतपणे भारतात राहत असल्याची गोपनीय माहिती अनैतीक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार यांना मिळाली असता त्यांनी नालासोपारा पूर्व येथील अनधिकृतपणे राहत असलेले बांगलादेशी नागरिकांना अटक केली. पुरुष व महिलेस त्यांचे नाव ,पत्ता व भारतीय नागरीकत्वाची कागदपत्रे विचारली असता त्यांनी आकाश आरीफ खान, लाबोनी पोरीधीन मंडल असे सांगून शिवसम्राट बिल्डींगमध्ये राहत असल्याचे सांगितले. त्यांच्याकडे कोणताही परवाना आढळून आला नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

CamScanner

लोकसत्ता पु.पा.१.

# सफाई कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष

## मलजल टाक्या स्वच्छतेसाठी खासगी कामगारांचाच वापर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरार शहरात भुयारी गटारे, मलजल टाक्या, सांडपाणी प्रकल्प यांची स्वच्छता मानवी पद्धतीने करवून घेण्याचे प्रकार सुरूच आहेत. कोणत्याही प्रकारच्या सुरक्षेच्या साधनांविनाच ही स्वच्छता केली जात आहे. यामुळे विषारी वायूमुळे गुदमरून मृत्यू होण्याच्या घटना वाढत असून सफाई कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

इमारती आणि निवासस्थानांमधील मलजल टाकी (सेप्टिक टँक) साफ करताना सफाई कर्मचारी टाकीत उतरत असतात. त्यांना कुठलीच सुरक्षेची साधने तसेच प्रशिक्षण नसते. त्यामुळे अनेकांचा मृत्यू होत असतो. ते रोखण्यासाठी खासगी इसमांकडून मानवी पद्धतीने मैला टाकी साफ करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. मात्र या नियमांकडे सर्रास दुर्लक्ष करून मानवी पद्धतीने भूमिगत गटारे आणि मलजल टाक्यांची साफसफाई केली जात आहे. सुरक्षेच्या साधनांचा वापर केला जात नसल्याने टाकीत तयार होणाऱ्या विषारी वायूचा मोठा परिणाम हा सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर होऊ लागला आहे. काहीवेळा या विषारी वायूमुळे गुदमरून मृत्यू होण्याच्या घटना समोर येत आहेत.

नुकतीच विरारच्या ग्लोबल सिटी परिसरात सांडपाणी प्रकल्पाची स्वच्छता करताना तीन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. अशा घडणाऱ्या घटनांना पायबंद घालण्यासाठी प्रशासनाकडून योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. दुर्घटनांमुळे पालिकेच्या क्षेत्रात कोणत्याही खासगी सफाई कर्मचाऱ्यांकडून मलजल टाक्या स्वच्छ करण्यास मनाई केली होती. ज्यांना टाक्यांची स्वच्छता करायची असेल त्यासाठी पालिकेकडे अत्याधुनिक उपकरणे व प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी आहेत यासाठी पालिकेशी संपर्क करण्याचे आवाहनही केले होते. मात्र या मनाई आदेशाला झुगारून खासगी सफाई कर्मचाऱ्यांना सांगून टाक्या साफ केल्या जात असल्याने पालिकेचे मनाई आदेशाकडे दर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येत आहे.

### टाकी साफ करण्यासाठी पालिकेचा टोल फ्री क्रमांक

**मलजल टाकी खासगी व्यक्तींकडून साफ करून घेतली जाते. मात्र त्यांना प्रशिक्षण नसते, तसेच सुरक्षेची साधने दिलेली नसतात. यामुळे दुर्घटना घडत असते. असे प्रकार रोखण्यासाठी वसई-विरार महापालिकेने मानवी पद्धतीने स्वच्छता करण्यास मनाई केली आहे. याशिवाय निवासी आणि व्यावसायिक संकुलातील मैला टाकी साफ करण्यासाठी पालिकेने स्वतःची यंत्रणा उभारली आहे. प्रत्येक प्रभागासाठी मैला स्वच्छता वाहन व सक्शन पंप वाहन खरेदी केली आहेत. यासाठी १४४२० हा टोल फ्री क्रमांक सुरू केला आहे. मागील वर्षभरात पालिकेच्या हेल्पलाइन क्रमांकावर ७८० इतक्या तक्रारी प्राप्त झाल्या असून जवळपास १ हजार ३५८ इतक्या वेळा वाहनांतून मैला वाहतूक करण्यात आल्याची माहिती महापालिकेच्या स्वच्छता विभागाचे प्रभारी सहायक आयुक्त सुखदेव दरवेशी यांनी दिली आहे. दुर्घटना टाळण्यासाठी नागरिकांनी मानवी पद्धतीने टाक्या स्वच्छ न करता पालिकेच्या यंत्रणेची मदत घ्यावी असे आवाहनही पालिकेने केले आहे.**

## सांडपाण्याच्या टाकीत कामगाराचा मृत्यू

### आठवडाभरातील दुसरी घटना

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** सांडपाण्याच्या टाकीची साफसफाई करण्यासाठी उतरलेल्या एका सफाई कामगाराचा गुदमरून मृत्यू झाला आहे. वसईच्या चिंचपाडा येथे ही दुर्घटना घडली आहे. अवघ्या आठवडाभरापूर्वीच विरार येथे सांडपाणी प्रकल्पाच्या टाकीत गुदमरून चार कामगारांचा मृत्यू झाला होता.

वसई पूर्वेच्या चिंचपाडा येथे एव्हरशाईन इंडस्ट्री आहे. येथील सांडपाण्याची टाकी साफ करण्यासाठी दुपारी तिरुपती भुट्टे (३३) या सफाई कामगाराला बोलावण्यात आले होते. दुपारी तीनच्या सुमारास कुठल्याही सुरक्षेच्या साधनांशिवाय तो टाकीत उतरला होता. मात्र टाकीतील विषारी



संग्रहित छायाचित्र

वायूमुळे त्याचा श्वास गुदमरून तो बेशुद्ध झाला. त्याला उपचारासाठी आधी आयकॉन या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. नंतर प्रकृती खालावल्याने पालिकेच्या सर डी. एम. पेटिट रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचारादम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. आम्ही या प्रकरणी तपास करत असून त्यानंतर संबंधितांवर पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती वालीव पोलीस ठाण्याचे तपास अधिकारी दराडे यांनी दिली. शौचालये आणि सांडपाण्याची टाकी खासगी व्यक्तींकडून साफ करण्यास बंदी असून असे करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात येतो.

९ एप्रिल रोजी विरारच्या ग्लोबल सिटी येथे खासगी सांडपाणी प्रकल्पाची सफाई करण्यासाठी उतरलेल्या शुभम पारकर (२८), अमोल घाटाळ (२७) निखिल घाटाळ (२४) आणि सागर तांडेलकर (२९) या चार कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला होता. मात्र एवढी मोठी घटना घडल्यानंतरही हा प्रकार सुरूच होता आणि आठवडाभराच्या अंतराने आणखी एका कामगाराला आपला जीव गमवावा लागला.

CS CamScanner

लोकमत पु.प.१.

## दोन बांगलादेशी पकडले

**नालासोपारा :** नालासोपारा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलिसांनी प्रगतीनगर परिसरातून दोन बांगलादेशी नागरिकांना पकडले आहे. प्रगतीनगरच्या शिवसम्राट बिल्डिंगमध्ये सोमवारी धाड टाकून महिला लाबोनी मंडल (२२) आणि आकाश खान (२६) यांना ताब्यात घेतले. या दोघे भारतामध्ये प्रवेश करण्यासाठी आवश्यक कोणतेही कागदपत्र न बाळगता अनधिकृतपणे वास्तव्य करताना आढळले. महिला पोलिस हवालदार साक्षी डोईफोडे यांनी तुळींज पोलिस ठाण्यात तक्रार देऊन भारतीय पासपोर्ट अधिनियमाद्वारे गुन्हा दाखल केला आहे.

## चार मुलींसोबत केले गैरकृत्य

**नालासोपारा :** प्रगतीनगरच्या परिसरात असलेल्या बेकरीच्या दुकानात १३ ते १५ मार्चदरम्यान खाऊ खरेदी करण्यासाठी गेलेल्या चार पीडित मुलींसोबत आरोपी अफजल अली या दुकानदाराने गैरकृत्य केले. त्याने त्यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन त्यांचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. एका मुलीच्या आईने तुळींज पोलिस ठाण्यात सोमवारी तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

पुढारी पु.प. II


# वसईत बिबट्याची दहशत

## संध्याकाळी रो-रो सेवा बंद करण्याची सूचना

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

वसईच्या किल्ला परिसरात मागील पंधरवड्यापासून बिबट्या मोकाट असल्याने वसईकरांची भीतीने पाचावर धारण बसली आहे. या भागातील नागरिकांचे जीवन बिबट्याच्या दहशतीमुळे विस्कळीत झाले आहे. बिबट्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी नुकतेच प्रांत अधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत स्थानिकांनी संताप व्यक्त केला. बिबट्यामुळे संध्याकाळी ६ नंतर रोरो बोटीच्या सेवा बंद कराव्या अशी मागणी पुरातत्व खाते तसेच वनविभाहाने महाराष्ट्र सागरी मंडळाला केली आहे.

२९ मार्च रोजी वसईच्या ऐतिहासिक किल्ल्यात बिबट्या आढळला होता. तेव्हापासून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र अद्याप बिबटा सापडलेला नाही. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी शनिवारी वसईच्या उपविभागीय कार्यालयात बैठक



आयोजित करण्यात आली होती या बैठकीत प्रांताधिकारी शेखर घाडगे, तहसीलदार डॉ. अविनाश कोष्टी, वनविभागाच्या मांडवी वनपरिक्षेत्र अधिकारी श्वेता आडे, पुरातत्व विभागाचे कैलास शिंदे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक रणजित आंधळे, रो-रो सेवा कर्मचारी, कोळीयुवा शक्ती संघटनेचे पदाधिकारी तसेच किल्लाबंदर-पाचूबंदर येथील ग्रामस्थ उपस्थित होते. मात्र या बैठकीत बिबट्याला पकडण्यात येत असलेल्या अपयशामुळे नागरिक आक्रमक झाले होते. बिबट्यामुळे या भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अशी परिस्थिती असतानाही

### पकडण्यासाठी मोहीम

बिबट्याच्या वावरामुळे असंख्य अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत. त्याला जेरबंद करण्यासाठी वनविभागाने आपले प्रयत्न वाढवा अशा सूचना वसईचे उपविभागीय अधिकारी शेखर घाडगे यांनी केल्या आहेत. आमच्या स्तरावरून जी काही मदत लागेल ती देण्यास ही आम्ही तयार आहोत.तसेच बिबट्या बाहेर येण्याच्या वेळेत सातत्याने मानवी वर्दळ, रोरो सेवा यामुळें पकडण्यात अडचणी येत असल्याचे मांडवी वनपरीक्षेत्र अधिकारी श्वेता आडे यांनी सांगितले आहे.

वनविभागाकडून बिबट्याला पकडण्यासाठी हव्या त्या प्रमाणात प्रयत्न केले जात नसल्याचा आरोप कोळी युवा शक्ती संघटनेचे मिल्टन सौदीया यांनी केला आहे. वन विभाग बिबट्याला शोधण्यासाठी खरंच पिंजरे व ट्रॅप कॅमेरे लावले आहेत का ? आदी प्रश्न उपस्थीत केले आहेत.

लोकमत पु.प.१.

## गुन्हे शाखेने गांजा पकडला



**नालासोपारा :** गुन्हे शाखेच्या युनिट तीनचे पोलिस अंमलदार सचिन घेरे यांनी सोमवारी संध्याकाळी पावणे पाचच्या सुमारास गांजा पकडला आहे. वीर सावरकर मार्गावरील वाहिद दुकानाजवळ कल्पेश मिश्रा (१९) याला पकडले. त्याच्या ताब्यात विक्रीसाठी आणलेला ५ हजारांचा ४६० ग्रॅम गांजा मिळून आला आहे. विरार पोलिस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

## श्वास गुदमरून कामगाराचा मृत्यू



**नालासोपारा :** वसईच्या चिंचपाडा येथील एव्हरशाईन इंडस्ट्रीमधील सांडपाण्याची टाकी साफ करण्यासाठी उतरलेल्या कामगाराचा श्वास गुदमरून रविवारी दुपारी मृत्यू झाला आहे. तिरुपती भुट्टे (३३) असे या मृत्यू झालेल्या कामगाराचे नाव आहे. तो घटनेच्या दिवशी टाकी साफ करण्यासाठी उतरल्यावर बेशुद्ध झाला होता. त्याला उपचारासाठी प्रथम आयकॉन व नंतर मनपाच्या डी. एम. पेटीट हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले होते. तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. वालीव पोलिसांनी सोमवारी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

लोकसत्ता पु.पा.४.

# बेकरीचालकाचा मुलींवर अत्याचार

**वसई :** नालासोपारामध्ये एका बेकरीचालकाकडून परिसरातील अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आतापर्यंत चार मुलींनी याप्रकरणी तक्रार दिली आहे. तुळींज पोलिसांनी बेकरीचालकाला अटक केली आहे. त्याने आणखी मुलींसोबत गैरप्रकार केले आहेत का, त्याचा पोलीस तपास करत आहेत.

नालासोपारा पूर्वेला आरोपी अफजल हुसैन अली याची बेकरी आहे. या बेकरीत परिसरातील मुली खरेदीसाठी येत असताना अली त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करत होता. याबाबत एका पीडितेच्या आईने पोलिसांना सांगितले की, सोमवारी जेव्हा तिची मुलगी केक खरेदी करून घरी परतली तेव्हा तिने घडलेला प्रकार सांगितले. बेकरीच्या मालकाने तिला दुकानात बोलावले आणि तिला अयोग्यरीत्या स्पर्श केला. पीडितेच्या आईने परिसरातील अन्य महिलांना या प्रकाराबाबत सांगितले. तेव्हा आणखी तीन महिला पुढे आल्या. त्यांच्या मुलींसोबतही बेकरीचालक अफजल अली याने गैरप्रकार केले होते. त्यानंतर चारही महिलांनी तक्रार दिली.

CamScanner